प्रेस नोट दि. ०४/०९/२०१९

## सोलापूर ग्रामीण पोलीस दल

### वाहतुक नियमानुसार करण्यात आलेल्या दंडाची रक्कम व (Unpaid) चलानची माहीती ऑनलाईन पाहण्यासाठी व दंडाची रक्कम ऑनलाईन भरण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोबाईल ॲप विकसित केले बाबत......

oooooo

यात निवेदन असे की, राज्यात महाराष्ट्र शासनाचा वन स्टेट वन ई चलान प्रकल्प माहे एप्रिल २०१९ पासुन संपुर्ण सोलापूर ग्रामीण जिल्हयात कार्यान्वीत झाला असुन सदरबाबत नागरिकांना त्यांच्या वाहनांवर वाहतुक नियमाखाली करण्यात आलेल्या परंतु प्रलंबित (Unpaid) असलेल्या चलानची माहिती पाहण्यासाठी तसेच प्रलंबित (Unpaid) चलान असेल तर नागरिकांनी स्वत: दक्ष राहून प्रलंबित दंडाची रक्कम ऑनलाईन भरणेसाठी महाराष्ट्र राज्य वाहतुक पोलीस दला मार्फत मुंबई शहरासाठी Mum Traffic व महाराष्ट्रातील इतर जिल्हयांसाठी व शहरासाठी Maha Traffic या प्रमाणे महाराष्ट्र शासनाने मोबाईल ॲप विकसित करण्यात आलेले आहे, त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे

१) सदरचे ॲप हे हाताळण्यास अत्यंत सोपे असुन अन्ड्राईड मोबाईल साठी प्ले स्टोर व ॲपल मोबाईल साठी आयओएस स्टोर मधुन डॉउनलोड करू शकता आपल्या वाहना विरुध्द प्रलंबित असलेला वाहतुक दंड हा सदरच्या ॲपवर पाहू शकता तसेच दंडाची रक्कम सोप्या पध्दतीने ऑनलाईन भरू शकता.

२) सदर ॲपमधील My Vehicle या चिन्हावर क्लिक करून त्यामध्ये आपल्या वाहनाचा नंबर टाकावा, तसेच वाहनाचे इंजिन किंवा चेसिसचे शेवटचे ४ अंक भरावेत.

३) जर तुमच्या वाहनांवर ई-चलान व्दारे करण्यात आलेल्या प्रलंबित दंड असेल तर My E-Challan वर क्लिक करून तडजोड रक्कम क्रेडीट/डेबीट कार्ड्स किंवा इंटरनेट बॅकींग व्दारे भरू शकता.

तरी नागरिकांनी सदर ॲपच्या वापर करून ई-चलान व्दारे आपले वाहनांवरती वाहतुक नियमानुसार करण्यात आलेला परंतु प्रलंबित असलेला दंड सदरच्या ॲप माध्यमातून भरुन महाराष्ट्र वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे सोलापूर ग्रमीण पोलीस दल तसेच जिल्हा वाहतुक शाखा सोलापूर ग्रामीण यांचे कडुन आवाहन करण्यात येत आहे.

प्रती,

मा.संपादक ..........

तरी सदर बातमी आपले लोकप्रिय दैनिक वर्तमान पत्रातून प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर याचेंकडे स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिध्दी करणेस रवाना

पोलिस निरिक्षक
जिल्हा वाहतुक शाखा सोलापूर ग्रा